# मराठी विज्ञान परिषद

**विज्ञान भवन, वि. ना. पुरव मार्ग, शीव-चुनाभट्टी (पूर्व), मुंबई 400 022**

दूरध्वनीः 022-24054714 / 022-24057268 फॅक्सः 022-24057268

ई-मेल: office@mavipamumbai.org

## विज्ञान संशोधन पुरस्कार स्पर्धा – 2010

(1) विज्ञान संशोधन पुरस्कार स्पर्धा ही युवकांत संशोधनाची आवड निर्माण होऊन ती वाढीस लागावी या उद्देशाने घेतली जाणारी स्पर्धा आहे. या स्पर्धेसाठी (अ) परशुराम बाजी आगाशे विज्ञान संशोधन पुरस्कार, (ब) लीला परशुराम आगाशे विज्ञान संशोधन पुरस्कार आणि (क) शरद नाईक विज्ञान संशोधन पुरस्कार, असे प्रत्येकी रू. 10,000 रकमेचे तीन पुरस्कार दरवर्षी दिले जातात.

(2) ही स्पर्धा शालांत परीक्षा उत्तीर्ण झालेल्या परंतु पदवीधर नसलेल्या आणि वयाची 25 वर्षे पूर्ण न केलेल्या सर्वांसाठी खुली आहे. महाविद्यालयात (कोणत्याही शाखेत) शिक्षण घेणारे विद्यार्थी तसेच महाविद्यालयात शिक्षण न घेणाऱ्या व्यक्तीही या स्पर्धेत भाग घेऊ शकतात.

(3) स्पर्धेसाठी पाठवलेला प्रकल्प हा विज्ञानाच्या वा तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील असायला हवा. मराठी/इंग्रजी/हिंदी यापैकी कोणत्याही भाषेतील प्रकल्प स्पर्धेसाठी स्विकारार्ह असेल.

(4) स्पर्धेत भाग घेण्यासाठी प्रकल्पाच्या संपूर्ण तपशीलाची एक प्रत पाठवावी. ही प्रत - हस्तलिखित/टंकलिखित/संगणकाच्या साहाय्याने छापलेली - या पैकी कोणत्याही प्रकारची असली तरी चालेल. तसेच या प्रतीतील मजकूराच्या लांबीवर वा स्वरूपावर कोणतेही बंधन नाही. मात्र तपशीलाची मांडणी अतिशय सुस्पष्ट हवी.

(5) स्पर्धेसाठी प्रकल्पाचा तपशील पाठवताना त्याबरोबर या माहितीपत्रकासोबत जोडलेला अर्ज योग्यरित्या भरून परिषदेच्या मुंबईतील पत्त्यावर पाठवावा. प्रत्येक प्रकल्पासाठी प्रवेशशुल्क रू. 150 इतके आहे. हे शुल्क अर्जासोबत डिमांड ड्राफ्टने परिषदेच्या पत्त्यावर पाठवावे. मुंबईतील स्पर्धकांनी चेकद्वारे वा रोख शुल्क भरले तरी चालू शकेल. डिमांड ड्राफ्ट वा चेक हा ‘मराठी विज्ञान परिषद’ किंवा ‘Marathi Vidnyan Parishad’ या नांवे काढावा.

(6) नियम क्र. 2 मध्ये उल्लेख केलेल्या वय व शैक्षणिक पात्रतेसाठी, प्रकल्प स्पर्धेत दाखल करण्याची तारीख ही संदर्भ तारीख मानली जाईल.

(7) स्पर्धेसाठी प्रकल्प पाठवण्याची शेवटची तारीख 31 डिसेंबर 2010 ही आहे.

(8) एकाच प्रकल्पात एकाहून अधिक स्पर्धकांचा समावेश असू शकेल. मात्र एकाच प्रकल्पातील एकूण स्पर्धकांची संख्या चारहून अधिक असता कामा नये. प्रत्येक स्पर्धक एकाहून अधिक प्रकल्पात सहभागी होऊ शकतो.

(9) प्रकल्पात उल्लेखलेले संशोधन हे या स्पर्धेकरीताच केलेले असावे. (उदा. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी हे संशोधन आपल्या नेहमीच्या अभ्यासक्रमाचा भाग म्हणून सादर करण्यासाठी केलेला प्रकल्प नसावा.) प्रत्येक अर्जाबरोबर माहितीपत्रकासह दिलेले प्रतिज्ञापत्रक जोडावे. या प्रतिज्ञापत्रकावर सर्व स्पर्धकांची स्वाक्षरी असावयास हवी. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या बाबतीत या प्रतिज्ञापत्रावर महाविद्यालयातील विभाग प्रमुखाचीही स्वाक्षरी असावयास हवी. इतरांच्या बाबतीत ही स्वाक्षरी आपल्या मार्गदर्शक/पालक यापैकी कोणाचीही चालू शकेल.

(10) परिषदेकडे एकदा पाठवला गेलेला प्रकल्प स्पर्धेच्या शेवटच्या तारखेपर्यंत सुधारित स्वरूपात पुनः सादर करता येईल. असा सुधारित प्रकल्प सादर करताना त्याबरोबर, प्रकल्पात सुधारणा करण्यामागचे कारण देणारे पत्र सर्व स्पर्धकांच्या स्वाक्षरीसह द्यावे लागेल. असा सुधारित प्रकल्प पाठवताना, त्याबरोबर बदललेल्या तपशीलासह नवा अर्ज पाठवणे जरूरीचे आहे. अशा प्रकारचा सुधारित प्रकल्प पाठवताना त्याबरोबर प्रवेशशुल्क पुनः पाठवण्याची आवश्यकता नाही.

सुधारित स्वरूपात पाठवल्या गेलेल्या प्रकल्पात अतिरिक्त स्पर्धकांचा समावेश असू शकेल. मात्र कोणत्याही परिस्थितीत स्पर्धकांची संख्या चारहून अधिक असता कामा नये. सुधारित अर्ज दाखल करते वेळी प्रकल्पात नव्याने समावेश केल्या गेलेल्या स्पर्धकांच्या बाबतीत नियम क्रमांक 2 मधील अटींची पूर्तता होणे आवश्यक असेल. सुधारित प्रकल्पाबरोबर सर्व स्पर्धकांना नियम क्रमांक 9 मध्ये उल्लेख केलेले प्रतिज्ञापत्र संबंधितांच्या विभाग प्रमुख/मार्गदर्शक/पालक यांच्या प्रतिस्वाक्षऱ्यांसह पुनः द्यावे लागेल.

(11) स्पर्धेसाठी पूर्वी पाठवला गेलेला एखादा प्रकल्प काही अपरिहार्य कारणांमुळे परीक्षकांसमोर सादर करता आलेला नसल्यास, तो प्रकल्प या वर्षीच्या स्पर्धेसाठी पुनः पाठवता येईल. पुनः पाठवलेला हा प्रकल्प नवा प्रकल्प समजला जाऊन त्यावर्षी लागू केल्या गेलेल्या सर्व अटी या प्रकल्पास लागू होतील. असा प्रकल्प पाठवताना, त्याबरोबर बदललेल्या तपशीलासह नवा अर्ज पाठवणे जरूरीचे आहे, तसेच त्यावर्षी लागू झालेले प्रवेशशुल्कही अर्जासोबत भरावे लागेल.

(12) स्पर्धेसाठी आलेल्या प्रकल्पांची प्राथमिक छाननी केली जाऊन हे प्रकल्प स्पर्धेच्या अटींची योग्यरित्या पूर्तता करीत आहेत की नाही हे तपासले जाईल. त्याच बरोबर या प्राथमिक छाननीच्या वेळी अपेक्षित दर्जा न गाठणारे प्रकल्प हे तज्ज्ञांकरवी बाद केले जातील. अंतिम सादरीकरणासाठी निवडण्यात आलेल्या प्रकल्पांबद्दलची माहिती व सादरीकरणाची तारीख संबंधित स्पर्धकांना, प्रकल्प पाठवण्याच्या शेवटच्या तारखेनंतर महिन्याभरात कळवली जाईल.

(13) प्रकल्पांचे अंतिम सादरीकरण हे मुंबईत होईल. सादरीकरणासाठी बाहेरगावांहून येणाऱ्या स्पर्धकांना मराठी विज्ञान परिषदतर्फे परिषदेच्या नियमांनुसार जाण्या-येण्याचा खर्च दिला जाईल. मात्र हा खर्च प्रत्येक प्रकल्पामागे जास्तीत जास्त दोनच स्पर्धकांना दिला जाईल. एखादा स्पर्धक एकाहून अधिक प्रकल्पांशी संबंधित असल्यास त्याला अर्थातच एकाच स्पर्धकाचा खर्च दिला जाईल.

(14) प्रत्येक प्रकल्पाच्या सादरीकरणाचा कालावधी हा जास्तीत जास्त 15 मिनिटांचा असेल. या सादरीकरणानंतर परीक्षकांकडून प्रश्न विचारले जातील. प्रकल्पाचे सादरीकरण हे मराठी/इंग्रजी/हिंदी यापैकी कोणत्याही भाषेत करता येईल. हे सादरीकरण एकाच स्पर्धकाकडून केले जाईल. परीक्षकांच्या प्रश्नांना उत्तरे मात्र त्या प्रकल्पातील इतर स्पर्धकही देऊ शकतील. परिषदेकडे पाठवलेल्या प्रकल्पातील मूळ लिखाणात नसलेली परंतु मूळ विषयाशी सुसंगत असणारी अशी अतिरिक्त माहिती स्पर्धकांना सादरीकरणादरम्यान देता येईल. स्पर्धक म्हणून नोंद न झालेल्या कोणाचाही समावेश संशोधक/लेखक म्हणून सादरीकरणात करता येणार नाही. श्रेयनामावलीत मात्र स्पर्धक आपल्या कोणत्याही व कितीही सहकाऱ्यांचा उल्लेख करू शकतील.

(15) प्रकल्पाचे मूल्यमापन करताना लक्षांत घेतल्या जाणाऱ्या गोष्टी पुढीलप्रमाणे आहेत – (क) प्रकल्पातील नाविन्य, (ख) संशोधनामागचा उद्देश, (ग) संशोधनामागच्या संकल्पनेतील सुस्पष्टपणा, (घ) संशोधनात वापरलेल्या नाविन्यपूर्ण कल्पना, (च) संशोधन करताना वापरलेली पद्धत (संदर्भ, निरीक्षणे, प्रयत्न, परिश्रम, वगैरे), (छ) निरीक्षणांचा दर्जा, (ज) निरीक्षणांपासून काढलेले निष्कर्ष, (झ) प्रकल्पाची उपयुक्तता, (त) सादरीकरण, (थ) संशोधनासाठी आलेला खर्च, लागलेला कालावधी, इत्यादी.

(16) प्रकल्पांची संख्या पुरेशी नसल्यास आणि/किंवा प्रकल्प अपेक्षित दर्जाचे नसल्यास पारितोषिकांची संख्या कमी केली जाईल.

(17) पारितोषिकांचे वितरण परिषदेच्या इ.स. 2010 सालच्या एप्रिल महिन्याच्या अखेरीस होणाऱ्या वर्धापनदिनी केले जाईल. पारितोषिक विजेत्यांना या समारंभात आपल्या प्रकल्पांचे उपस्थितांसमोर सादरीकरण करावे लागेल. या सादरीकरणाचा कमाल कालावधी हा 10 मिनिटांचा असेल. संस्थेच्या वर्धापनदिनाला उपस्थित राहाणारे विज्ञानप्रेमी हे वेगवेगळ्या क्षेत्रांतील असल्यामुळे, प्रकल्प सादरीकरणाची भाषा ही सर्वांना समजेल अशा स्वरूपाची सोपी हवी. पारितोषिक वितरणानंतरचे विजेत्यांकडून केले जाणारे सादरीकरण हे शक्यतो मराठी भाषेतून केले जावे.

--------------------------

## स्पर्धेसाठी पूर्वी आलेले काही प्रकल्प
## (उदाहरणादाखल)

- 2-मर्कॅप्टोबेन्झोथायोझोल वापरून निकेलचे प्रमाण काढणे
- अतिशय स्वस्त पद्धतिने बायोडिझेलची निर्मिती
- आलेख सिद्धांताच्या साहाय्याने तयार केलेले महाविद्यालयांसाठी कार्यक्षम वेळापत्रक
- केळ्याच्या सालीपासून कमी उष्मांक असलेली बिस्किटांची निर्मिती
- गवारीच्या मुळाशी असलेल्या सूक्ष्मजीवांचा अभ्यास
- चहाच्या चोथ्याचा गुलाबाच्या वाढीवर होणारा परिणाम
- जांभुळ, करवंदासारख्या कोकणातील फळापासून शुद्ध इथेनॉलची निर्मिती
- जैविक खतांचा भेंडीवरील परिणाम
- जैविक विघटन होणारे प्लास्टीक
- जैविकदृष्ट्या विघटनशील प्लास्टीकची निर्मिती
- डिसचार्ज ट्यूबची प्रतिकृती
- तीव्र चुंबकीय क्षेत्राचा ज्वाळांवर होणारा परिणाम
- पुण्याच्या परिसरात सापडणारे रोटीफर जीवाणू
- बॅसिलसः उपयुक्त साहाय्यकारी जीवाणू
- बोर्डीच्या परिसरात आढळणाऱ्या प्लवंगांचा अभ्यास
- महाविद्यालयांतील प्रयोगशाळेत निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे व्यवस्थापन
- रॉवोल्फिआ टेट्राफायला प्रजातीतील वृक्षांच्या गुणधर्माची नोंद
- विद्युत विच्छेदनाद्वारे पाण्यापासून हायड्रोजनची निर्मिती करण्यासाठी सौरघटांचा वापर
- सेल्युलोजचे विभाजन करणारे विकर
- सोयाबिनः कॉफीला शक्तिवर्धक पेय म्हणून पर्याय

-----------------------

## मराठी विज्ञान परिषद
## विज्ञान संशोधन पुरस्कार - 2010

(1) प्रकल्पाचे नांव: ______________________________

______________________________

(2) प्रकल्प पुनः सादर केला जात आहे का? (होय/नाही) ______________

(असल्यास मूळ प्रकल्प सादर केला गेल्याची तारीखः ______________)

(3) प्रकल्पाचा सारांशः ______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

(5) स्पर्धकांच्या स्वाक्षऱ्या:

| | |
|---|---|
| स्वाक्षरी:<br>नाव: | स्वाक्षरी:<br>नाव: |
| स्वाक्षरी:<br>नाव: | स्वाक्षरी:<br>नाव: |

## स्पर्धकांसंबंधीचा तपशील

(1) नाव: ____________________

(2) जन्मतारीख: ____________________

(3) शैक्षणिक माहिती: ____________________

(4) व्यवसाय: ____________________

विद्यार्थी असल्यास, विद्यार्थ्याच्या महाविद्यालयाचे/संस्थेचे नाव व पत्ताः

____________________

____________________

____________________ पीनः ____________________

5) पत्रव्यवहासाठी पत्ताः ____________________

____________________

____________________ पीनः ____________________

(6) दूरध्वनी क्र.: ____________________ (7) ई-मेल पत्ता: ____________________

---

(1) नाव: ____________________

(2) जन्मतारीख: ____________________

(3) शैक्षणिक माहिती: ____________________

(4) व्यवसाय: ____________________

विद्यार्थी असल्यास, विद्यार्थ्याच्या महाविद्यालयाचे/संस्थेचे नाव व पत्ताः

____________________

____________________

____________________ पीनः ____________________

5) पत्रव्यवहासाठी पत्ताः ____________________

____________________

____________________ पीनः ____________________

(6) दूरध्वनी क्र.: ____________________ (7) ई-मेल पत्ता: ____________________

*(स्पर्धकांची संख्या अधिक असल्यास या पृष्ठाची अतिरिक्त प्रत जोडावी.)*

## प्रतिज्ञापत्र

आम्ही (ज्यांनी खाली स्वाक्षरी केली आहे ते) मराठी विज्ञान परिषदेतर्फे आयोजित केल्या जात असलेल्या 'विज्ञान संशोधन पुरस्कार - 2010' या स्पर्धेसाठी जो प्रकल्प सादर करीत आहोत तो प्रकल्प, अन्य ठिकाणी सादर करण्यासाठी नव्हे तर या स्पर्धेसाठीच तयार केला आहे.

| | |
|---|---|
| स्पर्धकाची स्वाक्षरी<br><br>विभागप्रमुख/मार्गदर्शक/पालक यांची संमतिदर्शक स्वाक्षरी* | स्पर्धकाची स्वाक्षरी<br><br>विभागप्रमुख/मार्गदर्शक/पालक यांची संमतिदर्शक स्वाक्षरी* |
| स्पर्धकाची स्वाक्षरी<br><br>*विभागप्रमुख/मार्गदर्शक/पालक यांची संमतिदर्शक स्वाक्षरी** | स्पर्धकाची स्वाक्षरी<br><br>*विभागप्रमुख/मार्गदर्शक/पालक यांची संमतिदर्शक स्वाक्षरी** |

(माहितीपत्रकातील नियम क्रमांक 9 नुसार)

| |
|---|
| **कार्यालयासाठीः** |